५

# शैक्षणिक, समाजिक आणि आर्थिक क्रांतीचे प्रणेते . . .

# छत्रपती शाहू महाराज!

**प्रा. डॉ. सौ. नीलिमा अरविंद मोरे**
सहाय्यक प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

भारत माता ही नररत्नांची खाण आहे, त्या खाणीमध्ये वेगवेगळया नर-नारींचा समावेश आपल्याला झालेला दिसतो आहे, त्यापैकी एक 'नररत्न' म्हणजे राजश्री शाहू महाराज !

इतिहासामध्ये काही लोक त्यांच्या पराक्रमाने, तर काही त्यांच्या दृष्ट प्रवृत्तीने तर काहींचे सामाजिक योगदान फार मोठे असल्यामुळे तर काहींची आर्थिक बाजू फार चांगली असलेले तर काही साध्या राहणीमुळे प्रसिध्दिस आलेले असे लोक आपल्याला आढळतात .

राजश्री शाहू महाराजांना आपण नुसत्या त्यांच्या सामाजिक कार्यामुळेच ओळखत नाहीत तर राजश्री शाहू महाराज म्हटल्याबरोबर आपल्या डोळयांसमोर त्यांचे दोन फोटो येतात एक तर तारणाबंड हातात तलवार घेऊन उभा राहिलेला, आणि दुसरा म्हणजे फेटा बांधलेला उतरत्या काळातला . त्यानंतर डोळयांसमोर येत 'कोल्हापूर' त्यानंतर लगेच कोल्हापूरचे लाल मातीतील कुस्तीचे मैदान आठवते, त्याच्या बाजूने असलेली गर्दी आठवते - कारण महाराज + कुस्ती असे जणू समीकरणच झाले होते . त्याचप्रमाणे त्यांचे शैक्षणिक कार्याचे सुध्दा योगदान फार मोठया प्रमाणात आहे . त्यांची आर्थिक व्यवस्था ही सुध्दा आधुनिक समाजवादी अर्थ व्यवस्था होती . महाराजांनी एल . एल . डी . ही पदवी केंब्रिज विश्वविद्यालयातर्फे घेऊन जणू मानसिक विकासाची पावतीच दिलेली आहे असा हा राजा सहा फूट चार इंच लांब, बुरूजबंद छाती, हदयाचे वेध घेणारे पाणीदार भावुक डोळे, पहाडी आवाज, सिंहासारखा ऐटबाज जबडा, ऐरावती सारखी शक्ती, मृगेंदासारखी डौलदार चाल, भव्य बांधा आणि तिच्यावरील दिव्य तेज - स्वामी विवेकानंदानां जी १00 माणसे भारत मातेच्या उन्नतीसाठी पाहिजे होती, त्यातला एक म्हणजे शाहू महाराज!

महाराजांच्या सामाजिक कार्याचा आपल्याला जेव्हा जेव्हा आढावा घ्यायचा असेल तेव्हा तेव्हा आपल्याला त्यांचे शैक्षणिक कार्य पाहणे आवश्यक आहे कारण शिक्षण हा मनुष्याचा तिसरा डोळा आहे . शिक्षणाशिवाय माणसाची सामाजिक काय परंतू कोणतीही प्रगती होऊ शकत नाही . खरं म्हणजे शिक्षणाचा आणि समाजाच्या विकासाचा अन्योन्य असा संबंध आहे . शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊच शकत नाही . महाराजांनी ही परिस्थिती ओळखली, आणि सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी काढलेले बोर्डींग



Vol: 3rd, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

हे जातीभेद निर्मुलनाचे केंद्रच बनले होते . या बोर्डीगमध्ये महाराज जातीने लक्ष घालत असत . तूप, भात, मटण जातीने पाठवित असत . या वसतीगृहातील प्रत्येक विद्यार्थी हा देशाचा चारिज्यिसंपन्न व सुसंस्कृत बनविन्याचा प्रयत्न केला जात असे . कारण तिथे विद्यार्थ्यामध्ये स्वावलंबन, सहकार्य, सहिष्णूता, शिस्त आणि नियमितता आणण्याचा प्रयत्न केला जात असे . डॉ . राधाकृष्णन म्हणतात "The students are the pillars of the Nation" मग जर तुम्हाला देश बळकट करावयाचा असेल तर त्या देशातील विद्यार्थी बळकट होणे गरजेचे आहे हे शाहू महाराजांनी ओळखले होते . सर्व धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी काढलेल्या हया बोर्डीगच्या व्यतिरिक्त त्यांनी अन्य २० बोर्डीगस जातीनुसार काढलेले आहेत . या बोर्डीगमध्ये शिकलेले विद्यार्थी आज आपल्या भारत देशाची धुरा सांभाळत आहेत . शिक्षणाची गंगोत्री फक्त मुलांसाठीच त्यांनी उभी केली असे नाही तर मुलींसाठी त्यांनी खाली दिल्या प्रमाणे व्यवस्था केली .

राजाराम विद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींना फी माफी दिली होती . शाहू महाराजांनी त्यांच्या सूनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यावरही खडतर अशा विरोध-निषेधांना झुगारून देऊन शिक्षण दिले . कोल्हापूरचे संपूर्ण शिक्षणखाते हे इंदुमतीच्या हाती देण्याचा त्यांचा विचार इंदुमतीच्या निधनाने त्यांना वा-यावर सोडावा लागला . करवीर संस्थानच्या शिक्षणाधिकारी मिस लिटल यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या जागी श्रीमती रखमाबाई केळवळकर यांची नेमणूक महाराजांनी केली होती . इंग्रजी भाषेची महती ओळखून त्यांनी १९८४ मध्ये खेडयात इंग्रजी शाळा काढली होती, आणि शिक्षणाचे कार्य मिस लिटल या इंग्रज बाईवर सोपविलेले होते . स्त्रियांसाठी त्यांनी स्त्रिविषयक कायदे, बालविवाह, नागरी, विवाह (रजिस्टर विवाह) इत्यादी एकामागून एक कायदे मंजूर करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे कसोशिने प्रयत्न केले होते .

तांत्रिक शिक्षण, व्यवसायाभिमूख शिक्षणाचा पाया शाहू महाराजांनी त्या काळी रचला . यावरून आपल्याला त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना येवू शकते . अभ्यासू अशा सर्व लोकांसाठी त्यानी 'नेटीव्ह लायबरी', 'कागल' १८८० साली सूरू केली होती . आता त्या लायब्ररीचे नाव 'महात्मा गांधी वाचनालय' असे झाले आहे .

समाजातील अज्ञान,अंधश्रध्दा, अस्पृशता निवरण्याचे कार्य फार मोठया प्रमाणात शाहू महाराजांनी केले आहे . परंतु हे कार्य करीत असताना त्यांनी नुसते भाषणावाजी करून हे कार्य केलेले नाही तर ते आधी केले ,मग सांगितले' या उक्तीचा उपयोग करून केले आहे .

त्या काळातील अस्पृशतेचे वर्णन वाचले तर आपल्या अंगावर काटा उभा राहतो . साधे अंगभर चांगले कपडे, पायामध्ये चपल-जोडे जिथे घालण्याची सोय नव्हती, तिथे मग बाकीच्या गोष्टींबद्दल विचारच केलेला बरा अशा प्रकारची अस्पृशता त्यांनी निवारली . त्यांच्या दरबारात सर्व जातीचे, सर्व धर्माचे, सर्व पंथाचे लोक असत . त्यांचा डबा घेऊन आणावयासाठी एका महाराची नियुक्ती केलेली होती .



Vol: 3rd , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

गंगाराम महाराला तर त्यांनी भर चौकामध्ये चहाची टपरी टाकून दिली होती आणि महाराज मुद्दाम थांबुन त्यांच्या 'टपरीवरचा चहा' घेत असत आणि त्यांच्या सोबत असलेल्या सर्व लोकांना तो चहा घ्यायला भाग पाडीत असत . त्याचप्रमाणे एका आजीच्या (महार/मांग) 'केशर दुध' हे त्यांचे आवडते  पेय होते महाराज जेव्हा शिकारीसाठी जात असत तेव्हा ते त्याच परिसरातील मांग, महार, चांभार, सुतार, धनगर, कोळी, कोष्टी, वडर इत्यादी कोणीही जातीच्या व्यक्तींच्या घरचे जेवत असत आणि आपल्या सोबतीला असलेल्या इतर सर्वांना ते जेवायला भाग पाडीत असत .

जर दारूसिगारेटच्या सारखी वाईट सवय महाराजांना मोडावयची असेल तर ते त्यासाठी त्याला भाषण किंवा कानउघडणी करीत नसत . त्या व्यक्तीसमोर त्याच्याच वाईट सवयीची उजळणी करून नंतर यापेक्षा एखादी चांगली गोष्ट केली तर बरं निदान ते आपल्या कामाचे तरी आहे असे सांगीत असत .

महाराजांनी आपला भारत देश हा खेडयांमध्ये वसलेला आहे हे ओळखले होते आणि म्हणून त्यांनी शेतीमध्ये हरितक्रांती घडवून आणलेली आहे . त्यानंतर पशुसंवर्धनाची कास धरायला सांगितले आहे . पशुसंवर्धनासाठी तर त्यांनी चिंचल येथे १८८३ मध्ये 'घोडयाचे व जनावरांचे प्रदर्शन' आयोजित करून शंभर मैलांहून अधिक अंतरावरून येणा-या शेतरक-यांच्या प्रवासाचा खर्च देण्याची खास सोय केली होती . हेतु हाच की, लोकांनी पशुसंवर्धन करावे . त्याचप्रमाणे दवाखाना, सडका, दूतर्फा वृक्षारोपण करणारा, काटकसरीची आवड असणारा, दिवाळीच्या दिवशी दलित वस्तीमध्ये जाऊन नवीन कपडे, फराळाचे साहित्य वाटणा-या राजाची धडकी तर ब्रिटीशांनी सुध्दा घेतली होती .

ब्रिटीशांनी एक खलिता पाठवून महाराजांना दमदाटी केली हाती की, 'महाराजांनी आपल्या संस्थांना बाहेरच्या हद्दीत कोणतीही चळवळ करू नये' या अशाप्रकारच्या उर्मट खलित्यास हया राजाने उत्तर पाठविले होते की, तुम्ही मला पदच्युत करण्यापूर्वी मी राजीनामा देईन' पण बहुजन समाजाच्या उध्दाराचे माझे पवित्रकार्य मी प्राण जाईपर्यत सोडणार नाही, हा प्रसंग वाचतांना 'प्राण जाय पर वचन ना जाए' या युक्तीचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही . 'राजवैभव थोर असेल पण मी रयतेशी वचनबध्द आहे . ' त्यांचे असे करारी उत्तर बघून मला खालील ओळी आठवतात .

Woods are lovely, dark & deep  
But I have promises to Keep  
And miles to go, before I sleep,  
And miles to go, before I sleep.

या फाऊस्ट कवींच्या ओळींचे स्मरण करून देतात .

असा हा राजा क्रांतिकारक सुध्दा होता . कारण बॉम्ब कटाच्या खटल्यातील आरोपी बाळू अरविंद घोष यांना त्यावेळी ५ हजार रूपये महाराजांनी दिलेले होते .

महाराजांना माहित होते की, कुठलाही नवा विचार म्हटला की, त्याला विरोध हा होतोच असतो; परंपरेला बाधा आणणारा कोणताही विचार लोकांच्या पचनी पडणे कठिण असते विचाराच्या विकासक्रमात चढउतार होतच असतात . एखाद्या विशिष्ट विचाराला विशिष्ट कालपरिस्थितीत विरोध झाला तर, त्यातील तंथ्यांश ग्रहण करून पुढच्या पीढीत त्या विचाराचा विकास झालेला दिसतो . याचेच फलीत म्हणजे नेपोलीयनसारखा य:कश्चित चांभाराचा पोर अर्ध्या यूरोप खंडाचा बादशहा होवू शकतो . आई-बापाचा ठाव नसलेल्या रॅमसे मॅकडोनाव्हसारख्या अर्भकाला ब्रिटीश साम्राज्याच्या दो-या हातात असलेल्या बलाढय इंग्लिश राष्ट्राचा मुख्य दिवाण होता येत . एकेकाळी सेवक मानलेल्या शुद्र वर्गात जन्म झालेला असतांना डॉ . आंबेडकरांसारखा नेता हा शाहू महाराजांच्या सक्रिय आशीर्वादाने अस्पृशता निवारण्याचे फार मोठे कार्य करू शकतो .

शाहू महाराजांचे चरित्र वाचल्यावर मला खरोखर असे वाटायला लागले आहे की, जर शाहू महाराज नसते तर डॉ . बाबासाहेब घडले नसते कारण महाराजांनी त्यांना आर्थिक मदत तर केलीच वरून त्यांना सोनतळी कॅम्पवर जेवण दिले, जरी पटाक्याचा आहेर दिला, त्यांना सुयश चिंतून बरोबर समाजकारणात ओढले, आणि अस्पूश जनतेला 'हाच आता तुमचा भावी नेता' अशा शब्दात त्यांनी १९२० मध्ये माणगावला ओळख करून दिली . खरोखरचं हे एक फार मोठे मोलाचे काम शाहू महाराजांनी केले आहे .

अशा या महान राजाचा जन्म २६ जूलै १८७४ रोजी काराळच्या घराण्यामध्ये झाला ते जन्मत: राजघराण्यातील नव्हते .

अशा या राजाप्रति असलेले लोकांचे अभिप्राय - यशवंत मोहिते म्हणतात, 'महात्मा गौतम बुध्दानंतर महात्मा फुले हे थोर क्रांतिकारक झाले, यांच्या कामाची धुरा शाहू महाराजांनी वाहिली . शाहूमहाराज महाराष्ट्राचे गौतम बुध्द होत त्याचप्रमाणे सामाजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवणारा राजा .

पु .ल . देशपांडे शाहू महाराजांचा 'एक धिप्पाड माणूस' म्हणून उल्लेख करतात . शेतक-याच्या झोपडीपाशी जाऊन त्याच्या चुलीचरची भाकर खाऊन ढेकर देणारा राजा - शाहू महाराज हा किती मोठा राजा होता त्यापेक्षा किती मोठा माणूस होता, हे पाहणे मनाला आनंद देणारे आहे . नारायण ज्ञानदेव पाटील म्हणतात, "इतिहासाला कलाटणी देणारा महापुरूष' राजवाडयात जन्माला येऊनही तिथल्या ऐश्वर्यात व राजविलासात गुरफटून न पडता महारवाडा व मांगवाडा हे आपले कार्यक्षेत्र करणारा एकच राजा इतिहासाला ठाऊक आहे, तो म्हणजे कोल्हापूरचा राजा .



Vol: 3rd , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

कर्मवीर शिंदे यांनी 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरूष' अशा शब्दात यथार्थपणे गौरविलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचा गौरव 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ ' या शब्दांत करतात.

शाहूमहाराजांना 'एक थोर राष्ट्रपुरूष' म्हणून वि.भि. कोलते गौरवितात. तर कृष्णाजी लक्ष्मण मोरे - 'मानवतावादी राष्ट्रपुरूष' म्हणून त्यांचा सन्मान करतात. दादासाहेब मल्हारराव शिर्केंना महाराज 'दलितांचे राजा' वाटतात.

'टाईम्स ऑफ इंडियाने तर असे म्हटले आहे की, कोल्हापूरचे शाहू महाराज हे दुस-या कालखंडात जन्माला आले असते तर त्यांनी साम्राज्य स्थापन केले असते.

रणजित देसाई असे म्हणतात ' ध्वनी न पुरे गुण गाता' सी.रा.तायडेंना महाराज, 'सामन्य माणसांचे महाराज वाटतात तर गो.सी. टेंबेंना महाराज 'रसीला राजा' वाटतात या सर्वावर कहर म्हणजे भाई माधवराव बागलांना शाहू महाराज 'पूजास्थानी' ठेवावे वाटतात.

असा हा थोर सर्व गुणसंपन्न भारतमातेच्या गळयातला ताईत शनिवारी तारीख ६ मे १९२२ रोजी सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी मुंबईच्या पन्हाळा लॉजमध्ये काळजाच्या विकाराने त्रस्त होऊन तुटला.

'स्वतंत्रदेविचे तुटले मंगलमय मंगळसुत्र, एक कवि तर म्हणतो 'अरिते व्दारश अव्द न ज्याच्या चिंतेकरूनि निज लागे ! तो हा पुन्हा नुठाया वसुंधरे, तुज धरूनि निजला गे !

अशा या महामानवाला माझे कोटी कोटी प्रणाम

...


**संशोधन चेतना**

**वर्गणीचे दर**

| | वैयक्तिक | संस्था |
|---|---|---|
| वार्षिक | ६५०/- | ८००/- |
| त्रैवार्षिक | १८००/- | २४००/- |

Contact No. - 022-25774206 / 9822569727
Email - sanshodhanchetana@gmail.com
website - www.sanshodhanchetana.com




Vol: 3rd, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525